सर्वोदय

रस्किनची प्रसिद्ध साहित्यकृती
'अन्टू दिस लास्ट'चा सारांश

मो. क. गांधी



नवजीवन प्रकाशन मंदिर
अहमदाबाद-३८० ०१४

सर्वोदय

रस्किनची प्रसिद्ध साहित्यकृती

'अन्टू दिस लास्ट'चा सारांश

लेखक

मो. क. गांधी

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

प्रकाशक

नवजीवन प्रकाशन मंदिर

अनुक्रम

प्रस्तावना - ३
अनुवादकाचे ऋणनिर्देश - ६
१. सत्याची मुळे - ७
२. संपत्तीच्या रक्तवाहिन्या - २५
३. जशास तसेचा न्याय ३२
४. सत्य काय आहे? - ४०
५. सारांश - ४४

प्रस्तावना

पाश्चात्य राष्ट्रांमध्ये सामान्यपणे अशी मान्यता आहे की बहुसंख्य लोकांचे सुख वाढवणे, त्यांच्या अभ्युदयाकरिता प्रयत्न करणे माणसाचे कर्तव्य आहे. सुखाचा अर्थ शारीरिक सुख आणि आर्थिक सुख असा करण्यात येतो. त्यामुळे सुख मिळवण्याकरिता नीतिनियमांचा भंग करावा लागला तरी त्याची फारशी पर्वा करण्यात येत नाही. अशा प्रकारे बहुसंख्य लोकांना सुखी करण्याच्या हेतूमुळे काही थोड्या लोकांना दुःखी करावे लागले तरी त्याबद्दल पश्चिमेकडील लोकांना फारसे काही वाटत नाही. त्याचे जे परिणाम झाले ते तिकडच्या सर्व राष्ट्रांमध्ये दिसतात.

परंतु पश्चिमेकडील किती तरी विचारवंतांचे म्हणणे आहे की बहुसंख्य लोकांच्या केवळ शारीरिक आणि आर्थिक सुखाकरिताच प्रयत्न करणे हा ईश्वराचा नियम नाही आणि असे करत असताना नीतिनियमांचा भंग झाला तर ते ईश्वरी नियमांच्या विरोधी वर्तन होईल. असे सांगणा-यांमध्ये इंग्रज विद्वान स्वर्गीय जॉन रस्किन प्रमुख होते. त्यांनी कला, चित्रकला इत्यादी विषयांवर अनेक उत्तमोत्तम पुस्तके लिहिली आहेत. नीतीच्या विषयावरही त्यांनी बरेच काही लिहिले आहे. त्यांतील एक पुस्तक 'अन्टू द लास्ट' आहे. त्या पुस्तकाला ते आपली सर्वश्रेष्ठ कृती मानतात. जिथे जिथे इंग्रजी भाषा बोलली जाते तिथे तिथे या पुस्तकाचा प्रचार आहे. या पुस्तकात वर सांगितलेल्या विचारांचे फार सुंदर खंडन करण्यात आले असून नैतिक नियमांच्या पालनातच मानव जातीचे कल्याण आहे असे दाखवण्यात आले आहे.

आजकाल भारतात पश्चिमेकडील लोकांची फार नक्कल करण्यात येते. त्यातील काही गोष्टींची नक्कल करणे गरजेचेही आहे असे आम्हाला वाटते. परंतु पश्चिमेकडील अनेक परंपरा वाईट आहेत यात काही संशय नाही आणि जे वाईट आहे त्यापासून दूर राहिले

पाहिजे ही गोष्ट तर कोणीही कबूल करील.

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांची परिस्थिती अतिशय दयनीय आहे. पैसा मिळवण्याकरिता आपण परदेशात जातो. त्या धुंदीत नीती, ईश्वर यांना आपण विसरून जातो, स्वार्थात गुंतून जातो, भान विसरतो. परिणामी परदेशात राहण्यामुळे होणा-या लाभापेक्षा हानीच जास्त होते किंवा विदेश यात्रेचा पूर्णपणे लाभ होत नाही. सर्व धर्मांमध्ये नीतिमत्तेचा अंश असतोच. परंतु साधारण बुद्धीने पाहिले तरी नीतिनियमांचे पालन करणे आवश्यक आहे. यातच खरे सुख आहे, हे जॉन रस्किननी सिद्ध केले आहे. त्यांनी पश्चिमेकडील लोकांचे डोळे उघडले. आज युरोप आणि अमेरिकेमधील किती तरी लोक रस्किनच्या उपदेशानुसार चालतात. भारतीय जनतेलाही त्या विचारांचा लाभ मिळावा म्हणून या पुस्तकाचा सारांश देण्याचा विचार आम्ही केला आहे. यामुळे इंग्रजी न येणा-या लोकांनाही या विचारांचा लाभ घेता येईल.

माणसाने कसे वागले पाहिजे हे सॉक्रेटीसने थोडक्यात समजावून सांगितले आहे. ते जे सांगत होते रस्किनने त्याचाच विस्तार केला आहे असे म्हणता येईल. सॉक्रेटीसच्या विचारांप्रमाणे चालू इच्छिणा-या माणसाने वेगवेगळ्या व्यवसायात कसे वर्तन केले पाहिजे ते रस्किनने सांगितले आहे. त्यांच्या 'अन्टू धिस लास्ट' या पुस्तकाचा जो सार मी सांगितला आहे तो त्या पुस्तकाचा शब्दशः अनुवाद नाही तर माझ्या शब्दात सांगितलेला सारांश आहे. मी जर शब्दशः अनुवाद केला असता तर इंग्रजी बायबलमधील अनेक संदर्भ त्यात आले असते आणि ते वाचकांना न कळण्याची शक्यता होती. त्यामुळेच त्या पुस्तकाच्या नावाचासुद्धा मी अर्थ दिलेला नाही कारण त्यालाही बायबलमधील संदर्भ आहे. परंतु हे पुस्तक लिहिण्यामागील रस्किनचा हेतू सर्वांचे कल्याण - सर्वांचा उदय असल्यामुळे या पुस्तकाचे नाव मी 'सर्वोदय' असे ठेवले आहे.

मो. क. गांधी

अनुवादकाचे ऋणनिर्देश

'सर्वोदय' या पुस्तकाचा अनुवाद करण्याची संधी नवजीवन प्रकाशन आणि श्री. टीआरके सोमैया यांनी मला दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या निमित्ताने गांधीजींच्या विचारांचा अभ्यास करण्याची मला संधी मिळाली.

ब्रिजमोहन हेडा
bbheda@yahoo.com
दिनांक १ मे २०१२

१/ सत्याची मुळे

माणूस अनेक चुका करत असतो. परंतु माणसाच्या परस्परांविषयीच्या भावना, प्रेम, सहानुभूती यांचा विचार न करता माणसाला एखादे यंत्र समजून जेव्हा त्याच्या वर्तणुकीचे नियम तयार करण्यात येतात तेव्हा माणूस सगळ्यात मोठी चूक करतो. अशा प्रकारची चूक करणे माणसाकरिता अशोभनीय असते. अशाच प्रकारे माणसाने केलेल्या इतर चुकांकडे पाहताना असा भास होऊ शकतो की त्या चुका नाहीत, तेच बरोबर आहे. हीच गोष्ट लौकिक नियमांनाही लागू होते. लौकिक नियम तयार करणारे सांगतात की परस्परांबद्दलच्या भावना आणि प्रेम या आकस्मिक गोष्टी आहेत. त्यांच्यामुळे सर्वसाधारण स्वभाव असलेल्या माणसाच्या मार्गात अडसर निर्माण होतो. परंतु लोभ आणि पुढे जाण्याची इच्छा या गोष्टी कायम राहणार असल्यामुळे परस्परांबद्दलच्या भावना आणि प्रेम यासारख्या आकस्मिक गोष्टी दूर ठेवून माणसाला केवळ पैसा गोळा करणारे यंत्र समजले पाहिजे व कशा प्रकारच्या श्रमाने आणि देवघेवीने माणूस जास्तीत जास्त पैसा गोळा करू शकेल एवढाच विचार आपण केला पाहिजे. अशा प्रकारच्या विचारांच्या आधारे आपण व्यवहाराविषयीची आपली धोरणे आखली पाहिजे. अशा विचारांवर आधारित धोरण आखल्यानंतर परस्परांची इच्छा असेपर्यंत परस्परांच्या भावभावनांचा उपयोग करून आपण सामाजिक व्यवहार करू शकतो.

परस्परांविषयीच्या भावनेचा जोर देवघेवीच्या नियमासारखा असता तर वरील युक्तिवाद बरोबर आहे असे म्हणता आले असते. माणसाच्या भावना त्याच्या अंतरीचे बळ असतात. देवघेवीचा नियम हा सामाजिक नियम आहे. यामुळे या दोघांचा प्रकार एक नाही. एक गोष्ट एका विशिष्ट दिशेने जात असेल आणि तिला एका बाजूने एक निश्चित जोर लागत असेल व दुस-या बाजूने आकस्मिक जोर लागत असेल तर आपण आधी स्थायी जोराचा अंदाज घेऊ आणि नंतर

आकस्मिक जोराचा. आपण असे करू शकतो कारण स्थायी आणि आकस्मिक जोर एकाच जातीचे असतात. परंतु मानवी व्यवहारात देवघेवीच्या अचूक नियमांचा जोर आणि परस्परांच्या भावनांचा जोर हे वेगवेगळ्या जातीचे असतात. भावना माणसाला वेगळ्या प्रकाराने आणि वेगळ्या पद्धतीने प्रभावित करत असतात. त्यामुळे माणसाचे स्वरूपच बदलून जाते. वस्तूवरील विशिष्ट जोराच्या परिणामाची वेगवेगळ्या जोराच्या परिणामांशी तुलना करून आपल्याला वेगवेगळ्या जोरांचा हिशेब जसा लावता येऊ शकतो तसा माणसाच्या भावभावनांचा हिशेब देवघेवीच्या नियमांच्या आधाराने करता येत नाही. माणसाच्या भावनांच्या प्रभावाचा हिशेब देवघेव, खरेदीविक्री अथवा मागणी आणि पुरवठा यांच्या ज्ञानाने करता येत नाही.

सामाजिक विज्ञानाचे निष्कर्ष चुकीचे असतात असे मानण्याचे काही कारण नाही. माणसाच्या शरीरात केवळ मांस आहे; हाडे नाहीत असे गृहीत धरून एखादा व्यायमशिक्षक निष्कर्ष काढत असेल तर ते निष्कर्ष जरी वैध असले तरी ते हाडामांसाच्या माणसाला लागू पडणार नाहीत. त्याचप्रमाणे माणसाला भावना नाहीत असे गृहीत धरून काढण्यात आलेले सामाजिक विज्ञानाचे निष्कर्ष वैध असले तरी ते भावना असलेल्या माणसाला लागू पडू शकत नाहीत. समजा वरील व्यायामशिक्षक म्हणू लागला की हाडे नसलेल्या माणसाच्या मांसाचा चेंडू बनवता येऊ शकतो, ते मांस दाबून सपाट करता येते आणि मग त्यांची लांब दोरी तयार करता येते व त्यानंतर त्यात हाडे टाकता येतील तर त्यात काय चूक आहे? असे म्हणणा-या माणसाला आपण मूर्ख म्हणू कारण हाडे आणि मांस वेगळे गृहीत धरून व्यायामाचे नियम तयार करता येऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे प्रचलित विज्ञानाचे नियम माणसाच्या भावना विचारात न घेता तयार करण्यात आले तर त्यांचा उपयोग नसतो. ते काहीही असले तरी सामाजिक व्यवहार कसा असावा हे सांगणारे आजचे शास्त्रज्ञ वर सांगितलेल्या व्यायामशिक्षकासारखेच आहेत. त्यांच्या हिशेबाप्रमाणे माणूस केवळ

शरीर आहे व असे गृहीत धरून त्यांनी मानव विज्ञानाचे नियम बनवले आहेत. त्याला जीव आहे हे त्यांना माहीत असते परंतु ते ही गोष्ट विचारात घेत नाहीत. जीव, आत्मा असलेल्या माणसाला वरील गृहीतकांवरून काढलेले निष्कर्ष कसे लागू होतील?

अर्थशास्त्र हे शास्त्रच नाही. ते निरुपयोगी शास्त्र आहे. जेव्हा संप होतो तेव्हा ही गोष्ट आपल्याला स्पष्टपणे दिसू शकते. तेव्हा मालक एक विचार करतो, नोकर दुसरा. इथे देवघेवीचे नियम लागू पडू शकत नाहीत. अशा वेळी देवघेवीचे नियम आपण लागू करू शकत नाही. नोकर आणि मालकाचे स्वार्थ एकच आहेत हे व्यर्थ युक्तिवादाच्या आधारे सिद्ध करण्याचा माणूस प्रयत्न करत असतो. परंतु या बाबतीत तो काहीही करू शकत नाही. सत्य हे आहे की या ठिकाणी दोघांचेही लौकिक स्वार्थ, आर्थिक स्वार्थ जरी एक नसले तरी ते परस्परांच्या विरोधात असण्याची गरज नाही. एका घरात अन्न कमी असल्यामुळे लोक भुकेने मरत असतील, घरात आई आणि तिचा मुलगा असेल. दोघांनाही भूक लागली असेल व घरात भाकरीचा एकच तुकडा असेल. त्यामुळे खाण्याच्या दृष्टीने दोघांचेही स्वार्थ परस्पर विरोधी होतील. आई खाईल तर मुलगा उपाशी राहील आणि मुलगा खाईल तर आई उपाशी राहील. तरीही आई आणि मुलामध्ये कोणताही विरोध नसतो. आई ताकदवान आहे म्हणून ती भाकरीचा तो तुकडा खाऊन टाकत नाही. माणसांच्या परस्पर संबंधांनाही हीच गोष्ट लागू होते हे आपण समजून घेतले पाहिजे.

थोडा वेळ आपण असे गृहीत धरू या की पशू आणि माणूस यांच्यामध्ये नीतिमूल्यांच्या दृष्टीने काहीही फरक नाही आणि आपणही पशुंप्रमाणे आपापल्या स्वार्थाकरिता भांडलेच पाहिजे. तरीही मालक आणि नोकरामध्ये कायम अंतर राहील की राहणार नाही यासंबंधी आपण नक्की नियम सांगू शकत नाही. परिस्थितीप्रमाणे मजुरीच्या दरात फरक पडतो. चांगले काम होण्यात आणि पूर्ण किंमत मिळण्यात दोघांचाही स्वार्थ असतो. परंतु नफ्याच्या दृष्टीने पाहिले

तर एकाच्या लाभामुळे दुस-याची हानी होते असे दिसू शकते. नोकर आजारी आणि अस्वस्थ राहील इतका कमी पगार दिला तर मालकाच्या स्वार्थाची परिपूर्ती होणार नाही. तसेच अतिशय जास्त पगार मागणे मजुरांकरिताही हितावह नसते. नफा कमी झाल्यामुळे मालकाजवळ कारखाना दुरुस्त करण्याकरिता पैसे शिल्लक राहिले नाही तर नोकराला पूर्ण पगार तर सोडाच पण पगारच मिळू शकणार नाही.

यामुळे आपण लक्षात ठेवले पाहिजे की देवघेवीच्या नियमांच्या आधारावर कोणत्याही शास्त्राची निर्मिती करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. ईश्वरी नियमच असा आहे की पैशाच्या हानिलाभाच्या आधारावर माणसाने व्यवहार करू नये तर न्यायाच्या आधारावर व्यवहार केला पाहिजे. त्यामुळे माणसाने नीतीने म्हणा किंवा अनीतीने कसेही करून आपले काम काढण्याचा प्रयत्न सोडून दिला पाहिजे. आपल्या वर्तनाचे अखेरीस कोणते परिणाम होतील याचे भाकीत कोणताही माणूस करू शकत नाही. परंतु कोणते काम न्याय्य आहे आणि कोणते अन्याय्य हे तर माणसाला कळू शकतेच. त्यामुळे आपण एवढे नक्कीच सांगू शकतो की आपण नीतिमार्गाने चाललो तर त्याचे परिणाम नक्कीच हितावह होतील. परंतु परिणाम कोणते होतील वा कशा प्रकारे होतील हे आपण सांगू शकत नाही.

नीतिनियमांमध्ये परस्परांच्या प्रेमाच्या भावनेचाही समावेश असावा आणि ती भावना मालक-नोकर यांच्या संबंधाचा आधार असावी. नोकराकडून शक्य तेवढे जास्त काम करून घ्यावे, नोकराला थोडासाही विसावा घेऊ देऊ नये, नोकराला कमीतकमी पगार द्यावा, देह आणि प्राण एकत्र ठेवता येतील एवढेच त्याला खाऊ घालावे अशी मालकाची इच्छा असते असे आपण गृहीत धरले आहे. काही लोक म्हणतील की असे केल्यामुळे मालक कोणताही अन्याय करत नाही. किती काम करायचे याबद्दल मालकाने नोकराशी आधीच करार केलेला असतो. दुसरीकडे जास्त पगार मिळत असेल तर नोकराला

तिकडे नोकरी करण्याचीही सूट असते. आणि देवघेवीचे नियम सांगणारे अर्थशास्त्र आपल्याला सांगते की शक्य तेवढे अधिक काम कमीतकमी पैशात करवून घेतल्यामुळे मालकाचा फायदा होतो, संपूर्ण समाजाचा फायदा होतो आणि अखेरीस नोकराचाही फायदा होतो.

परंतु विचार करता आपल्या लक्षात येते की ही गोष्ट बरोबर नाही. नोकर जर एखाद्या यंत्राच्या साच्यासारखा असेल आणि ते चालवण्याकरिता विशिष्ट प्रकारच्या जोराची आवश्यकता असेल तर हा हिशेब लागू पडतो. पण इथे तर नोकराला संचालित करणारी शक्ती त्याचा आत्मा आहे आणि आत्म्याची शक्ती अर्थशास्त्रज्ञांच्या सर्व नियमांची उलथापालथ करून टाकते व त्यांना खोटे ठरवते. माणूसरूपी यंत्रात पैसारूपी कोळसा भरून जास्तीत जास्त काम करून घेता येऊ शकत नाही. त्याच्याकडून चांगले काम तेव्हाच करून घेता येऊ शकते जेव्हा त्याच्या भावना त्यात गुंतलेल्या असतात. मालक-नोकराच्या संबंधाची गाठ पैशाने नाही तर प्रेमाच्या धाग्याने बांधावी लागते.

साधारणपणे हुशार आणि उत्साही मालकाच्या दडपणामुळे नोकर अधिक काम करतो आणि ज्याचा मालक आळशी आणि दुबळा असेल त्याचा नोकर नजरेत भरण्याइतके काम करत नाही असे होऊ शकते. परंतु खरे पाहता सारखे हुशार असलेले दोन मालक घेतले तर नोकराविषयी जिव्हाळा असणा-या मालकाचा नोकर भावनाशून्य मालकाच्या नोकरापेक्षा जास्त काम करील.

कोणी म्हणेल की हा नियम बरोबर नाही. प्रेम आणि उपकाराचा मोबदला अनेकदा उलटाच मिळतो. अशा माणसाचे नोकर डोक्यावर बसतात. परंतु हा युक्तिवाद योग्य नाही. प्रेमाच्या बदल्यात बेफिकीरीने वागणा-या होणा-या नोकराशी पूर्वी कोणी तरी कठोर व्यवहार केलेला असावा त्यामुळे त्याच्या मनात कटुता भरून आता तो नवीन मालकाचा द्वेष करू लागला असावा. उदार मनाच्या मालकाशी जो नोकर अप्रामाणिकपणाने वागतो तो नोकर अन्यायी मालकाचेसुद्धा

नुकसान करत असतो.

अशा प्रकारे दर वेळी प्रत्येक माणसाशी परोपकाराच्या भावनेने वर्तन करण्याचे परिणाम चांगलेच होत असतात. इथे आपण भावनेचा एक प्रकारची शक्ती म्हणूनच विचार केला आहे. प्रेम इतकी श्रेष्ठ शक्ती आहे की तिचा उपयोग ही एक वेगळीच गोष्ट असते. तिचा आपण इथे विचार करत नाही. आपल्याला इथे इतकेच दाखवायचे आहे की अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य नियमांकडे आपण समग्र दृष्टीने पाहिले तर ते प्रेम, भावना, सहानुभूती यांची शक्ती वाया घालवतात. एवढेच नाही, भावना ही एक वेगळ्याच प्रकारची शक्ती असल्यामुळे अर्थशास्त्राचे नियम तिला लागू होऊ शकत नाहीत. हे नियम उचलून बाजूला ठेवल्यानंतरच ही शक्ती टिकू शकते. मालक जर वजनमापाचा हिशेब ठेवत असेल आणि मोबदल्याच्या आशेने प्रेम दाखवत असेल तर त्याच्या पदरी निराशा पडण्याचाच संभव अधिक असतो. प्रेम प्रेमाकरिताच केले पाहिजे, मोबदला तर न मागताच मिळत असतो. असे म्हणतात की जो स्वतःचा जीव द्यायला तयार असतो तो वाचतो आणि जो जीव राखून ठेवण्याचा प्रयत्न करतो तो मरतो.

सेना आणि सेनापतीचे उदाहरण घेऊ या. जो सेनापती अर्थशास्त्राच्या नियमांनुसार आपल्या सैन्याकडून काम करून घेण्याचा प्रयत्न करील तो त्यांच्याकडून अपेक्षित काम करून घेऊ शकणार नाही. जो सेनापती आपल्या सैनिकांशी घनिष्ठ संबंध ठेवतो, त्यांच्याशी प्रेमाने वागतो, त्यांच्या फायद्याने खूश होतो, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होतो, त्यांचे रक्षण करतो - थोडक्यात सांगायचे तर जो त्यांच्याबद्दल सहानुभूती ठेवतो तो त्या सैनिकांकडून कठीणाहून कठीण काम करून घेऊ शकत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. ऐतिहासिक उदाहरणांमध्येही आपण पाहतो की जिथे सैनिकांचे आपल्या सेनापतीवर प्रेम नसते तिथे युद्धात फार क्वचित जय मिळतो. सैनिक आणि सेनापती यांच्यामधील खरी शक्ती

ही प्रेमाचीच शक्ती असते. हीच गोष्ट लुटारूंच्या टोळीतही आढळते. डाकूंची टोळीही आपल्या सरदारावर पूर्ण प्रेम करत असते. परंतु गिरणी आणि कारखान्यांच्या मालक-मजुरांमध्ये आपल्याला ही गोष्ट कमी दिसून येते. याचे एक कारण असे आहे की अशा प्रकारच्या कारखान्यांमध्ये मजुरांच्या मजुरीचा आधार देवघेव, नफानुकसान हे असतात. यामुळे मालक आणि मजुरांमध्ये प्रेमाऐवजी दुरावा, सहानुभूतीच्या ठिकाणी वितुष्ट, प्रतिस्पर्धा या गोष्टी दिसून येतात. अशा अवस्थेत आपल्याला दोन प्रश्नांचा विचार करावा लागतो.

पहिला प्रश्न आहे मागणी आणि मिळकत यांचा विचार न करता केल्याशिवाय मजुराचा पगार निश्चित करता येऊ शकतो का?

पूर्वीच्या काळी मालक-नोकर वा सेनापती-सैनिक यांच्यात ज्याप्रमाणे कायम स्वरूपाचे संबंध असायचे त्याचप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत कारखान्यातील नोकरांची संख्या कमीअधिक न करता कायम कशी ठेवता येईल हा दुसरा प्रश्न आहे.

पहिल्या प्रश्नाचा विचार करू या. आश्चर्याची गोष्ट ही आहे की कारखान्यातील मजुरांना एका विशिष्ट दराने पगार कस मिळेल याचा उपाय शोधून काढण्याचा अर्थशास्त्रज्ञ प्रयत्न करत नाहीत. त्या पदावर कसाही माणूस असला तरी त्याला ठराविक तोच पगार दिला जातो. कमीतकमी पगार घेणा-याला आपण धर्मगुरूच्या पदावर बसवत नाही. डॉक्टर आणि वकिलांच्या बाबतीतही तोच नियम आहे. वरील प्रकारच्या उदाहरणात आपण ठराविक मोबदला देत असतो. यावर कोणी विचारू शकेल की चांगल्या आणि वाईट मजुराची मजुरी सारखीच असली पाहिजे काय? सर्व डॉक्टरांचे आणि वकिलांचे शुल्क सारखेच असले तर ज्याप्रमाणे सर्व अशील अथवा रुग्ण केवळ चांगल्या डॉक्टरांकडे अथवा चांगल्या वकिलांकडेच जातील त्याचप्रमाणे सर्व मजुरांची मजुरी एकच असली तर प्रत्येकाला केवळ चांगल्या सुतारांनाच कामावर ठेवावेसे वाटेल. चांगल्या कारागिराची खूण हीच असते की सर्वांना तोच कामाकरिता हवा असतो.

यामुळेच स्वाभाविक आणि ख-या पगाराचे दर ठरलेले असले पाहिजे. अडाणी माणूस कमी पगार घेऊन काम करत असेल तर तो मालकाचे नुकसानच करत असतो व अखेरीस त्याचे परिणाम वाईटच होत असतात.

आता दुस-या प्रश्नाचा विचार करू या. व्यापार कसाही चालत असेल तरी कारखान्यात सुरुवातीला जितक्या माणसांना कामावर ठेवण्यात आले असेल तितक्या माणसांना अखेरपर्यंत कामावर ठेवलेच पाहिजे. कामाची निश्चिती नसली तर कामगारांना जास्त पगार मागणे भाग पडते. परंतु आपली नोकरी कायम आहे याची त्यांना खात्री पटली तर ते थोड्या कमी पगारात काम करतील. यावरून स्पष्ट होते की जो मालक आपल्या कर्मचा-यांना कायम स्वरूपातील नोकरी देतो त्याचा अखेरीस फायदाच होतो. अशा कारखान्यात फार मोठा नफा होऊ शकत नाही, मालक फार मोठी जोखीम पत्करू शकत नाहीत, फार मोठी स्पर्धा करू शकत नाही. सैनिक सेनापतीकरिता मरायला तयार होतो आणि सैनिकीपेशा कामगाराच्या कामापेक्षा फार चांगल्या प्रतीचा आहे असे समजले जात नाही. खरे सांगायचे तर शिपायाचे काम मारण्याचे नसते, दुस-याचे रक्षण करता करता स्वतः मरण्याचे असते. जो शिपाई होतो तो आपले प्राण देशाच्या हाती सोपवतो. हीच गोष्ट वकील, डॉक्टर आणि धर्मगुरूंनाही लागू होते. याचमुळे त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते. वकिलाने जीव गेला तरी न्यायाच्या बाजूनेच उभे राहिले पाहिजे. कितीही संकट आले तरी वैद्याने आपल्या रुग्णावर उपचार केलेच पाहिजे. आणि धर्मगुरूने काहीही झाले तरी आपल्या समुदायाला ज्ञान देऊन योग्य मार्गदर्शन केलेच पाहिजे.

वरील गोष्ट जर व्यवसायात होऊ शकते तर मग व्यापारात का होऊ शकत नाही? व्यापाराचा अनीतीशी नित्य संबंध आहे असे समजण्याचे कारण काय? विचार केला असता असे आढळून येते की व्यापा-याला कायमच स्वार्थी मानण्यात आले आहे. व्यापा-याचे काम

जनतेकरिता आवश्यक आहे परंतु त्याचा हेतू केवळ स्वतःचे घर भरण्याचाच असतो असे आपण समजतो. व्यापा-याला पटापट नफा कमावता यावा अशाच प्रकारे कायदेही तयार करण्यात येत असतात. ग्राहकाने कमीतकमी पैसे देण्याचा प्रयत्न करायचा व व्यापा-याने अधिकाअधिक किंमत मागायची व घ्यायची अशीच पद्धतही आहे. लोकांनी स्वतःच व्यापाराला ही सवय लावली आणि आता त्याच्या अप्रामाणिकपणामुळे त्याच्याकडे हीन दृष्टीने पाहिले जाते. ही प्रथा बदलण्याची गरज आहे. व्यापा-याने आपल्याच स्वार्थाकरिता काम केले पाहिजे, पैसाच कमावला पाहिजे असा नियम तर नाही. अशा प्रकारच्या व्यापाराला आपण व्यापार म्हणणार नाही तर चोरी म्हणू. ज्याप्रमाणे शिपाई राज्याच्या सुखाकरिता स्वतःचे प्राण देतो त्याचप्रमाणे व्यापा-याने जनतेच्या सुखाकरिता पैसा गमावण्याची तयारी ठेवली पाहिजे, प्रसंगी प्राणही दिले पाहिजे. प्रत्येक राज्यांत-

शिपायाचे काम जनतेचे रक्षण करण्याचे असते;

धर्मोपदेशकाचे काम जनतेला शिक्षित करण्याचे असते;

चिकित्सकाचे काम जनतेच्या स्वास्थ्याची काळजी घेण्याचे असते;

वकिलाचे काम जनतेत न्यायाचा प्रचार करण्याचे असते

आणि व्यापा-याचे काम जनतेकरिता आवश्यक साधनसामुग्री जुळवण्याचे असते.

आणि या सर्वांचे कर्तव्य आपापले कर्तव्य पार पाडताना वेळ आली तर प्राणही देण्याचे असते.

पाठ फिरवण्याआधी शिपायाने आपल्या जागेवर ठाम उभे राहून मृत्यूचा स्वीकार केला पाहिजे.

प्लेगच्या वेळी पळ काढण्याऐवजी चिकित्सकाने तिथेच राहून रोग्यांवर उपचार केला पाहिजे.

सत्याचे शिक्षण देत असताना लोक मारून टाकणार असले तरी धर्मोपदेशकाने असत्याऐवजी सत्याचाच उपदेश करत राहिले पाहिजे.

न्यायाकरिता मरावे लागले तरीही वकिलाने न्याय्य निवाडा

होईल याकरिताच प्रयत्न केला पाहिजे.

अशा प्रकारे वरील व्यवसायांमधील लोकांकरिता मरण्याची वेळ कोणती याचा विचार व्यापा-यांनी आणि इतर सर्व लोकांनी केला पाहिजे. जो माणूस वेळ आली की मरण्याकरिता तयार होत नाही त्याला कसे जगावे हेही कळत नसते. आपण पाहिले आहे की व्यापा-याचे काम जनतेकरिता आवश्यक साधनसामुग्री जुळवण्याचे आहे. ज्याप्रमाणे धर्मोदेशकाचे काम पगार घेणे नाही तर उपदेश करण्याचे आहे त्याचप्रमाणे व्यापा-याचे काम संपत्ती गोळा करणे नसून साधनसामुग्री जुळवण्याचे आहे. धर्मोपदेशकाला भाकरी आणि व्यापा-याला नफा तर मिळूनच जातो, परंतु दोघांपैकी एकाचेही काम पगारावर वा नफ्यावर नजर ठेवणे नाही. पगार वा नफा मिळो अथवा न मिळो त्यांनी आपले काम, आपले कर्तव्य करतच राहिले पाहिजे. व्यापा-याचे काम उत्तम माल तयार करणे आहे व जनतेचा लाभ होईल अशा प्रकारे साधनसामुग्री जुळवण्याचे आहे. हा विचार बरोबर असेल तर व्यापा-याला समाजात श्रेष्ठ स्थान मिळाले पाहिजे. या कामात जे शेकडो वा हजारो कर्मचारी काम करत असतील त्यांचे रक्षण करणे व ते आजारी पडले तर औषधपाणी करणे हेही व्यापा-याचे कर्तव्य आहे. असे करण्याकरिता सहनशीलता, चिकाटी, सहानुभूती, प्रेम यांची नितांत गरज असते.

वेगवेगळी कामे करत असताना इतरांप्रमाणेच व्यापा-यावर प्रसंगी मरण्याची वेळ आली तरी त्याने आपले प्राण समर्पित केले पाहिजेत. अशा व्यापा-यावर कितीही कठीण प्रसंग आला तरी ना तो निकृष्ट माल विकेल ना लोकांची फसवणूक करील. तसेच सोबत काम करणा-यांबरोबर तो अतिशय प्रेमाने वागेल. मोठ्या कारखान्यात वा प्रतिष्ठानात नोकरी करणा-या तरुणांना अनेकदा घरदार सोडून दूरवर यावे लागते. अशा वेळी मालकालाच त्याचे आईवडील व्हावे लागते. मालक जर या बाबतीत बेफिकीर असला तर बिचा-या नवयुवकांची परिस्थिती आईवडिलांशिवाय दयनीय होते. यामुळे

पदोपदी व्यापा-याने स्वतःलाच प्रश्न करत राहिले पाहिजे की 'माझ्या मुलांशी मी जसे वर्तन करतो तसेच वर्तन या मुलांशी मी करतो की नाही?'

जहाजाच्या कप्तानाच्या हाताखाली जे खलाशी असतात त्यांत त्याचा मुलगाही असू शकतो. सर्व खलाशांना मुलाप्रमाणे मानणे कप्तानाचे कर्तव्य असते. त्याचप्रमाणे व्यापा-याकडे काम करणा-यांमध्ये त्याचा मुलगा जरी असला तरी कामकाजासंबंधी तो आपल्या मुलाशी जसे वर्तन करतो तसेच वर्तन त्याने इतर कर्मचा-यांशीसुद्धा केले पाहिजे. यालाच खरे अर्थशास्त्र म्हणतात आणि जहाज संकटात सापडल्यानंतर कप्तानाने सर्वात शेवटी जहाजावरून उतरणे हे जसे कप्तानाचे कर्तव्य असते त्याचप्रमाणे दुष्काळासारख्या परिस्थितीत आपल्या माणसांचे सर्वात आधी रक्षण करणे हे व्यापा-याचे कर्तव्य असते. काही लोकांना अशा प्रकारचे विचार विचित्र वाटू शकतात. परंतु असे वाटते की या युगाचे वैशिष्ट्य नाविन्यप्रियता आहे. विचार केल्यानंतर सर्वांना वाटेल की आता जी नीती सांगण्यात आली आहे तीच खरी नीती असू शकते. ज्या समाजाला प्रगती करायची असेल त्या समाजात दुस-या प्रकारची नीती उपयोगाची असूच शकत नाही. इंग्रज जमात अजूनही कायम आहे. तिने अर्थशास्त्राच्या नियमांचे अनुसरण केले म्हणून नव्हे तर, त्यातील काही लोकांनी अर्थशास्त्राचे नियम तोडून वर सांगितलेल्या नैतिक नियमांचे पालन केले. याच कारणामुळे ही नीती अजूनपर्यंत आपले अस्तित्व कायम टिकवून ठेवू शकली आहे. या नीतिनियमांचा भंग केल्यामुळे कोणत्या प्रकारची हानी होते आणि कशा प्रकारे समाजाची प्रगती थांबून त्याची घसरण होते याचा विचार आपण पुढे करणार आहोत.

सत्याच्या मुळाविषयी आम्ही आधीच सांगितले आहे. एखादा अर्थशास्त्रज्ञ याचे उत्तर काहीसे असे देईल- 'प्रेम, सहानुभूती वगैरेमुळे काही लाभ होऊ शकतात हे ठीक आहे. परंतु अर्थशास्त्रज्ञ

अशा प्रकारचे लाभ हिशेबात धरत नसतात. श्रीमंत होण्याचा उपाय काय एवढ्याच गोष्टीचा ते विचार करत असतात. हे शास्त्र चुकीचे नसून अनुभवाच्या आधारावर हे सिद्धान्त प्रभावी असल्याचे आढळून आले आहे. जे या शास्त्राप्रमाणे वर्तन करतात ते निश्चितपणे श्रीमंत होतात आणि जे असे वर्तन करत नाहीत ते कंगाल होतात. याविरोधी युक्तिवाद व्यर्थ आहे. पैसा कसा येतो आणि कसा जातो हे प्रत्येक अनुभवी व्यक्तीला माहीत असते.'

परंतु हे उत्तर बरोबर नाही. व्यापारी रुपये कमावतात; परंतु त्यांनी काही कमाई केली आहे की नाही आणि ती कमाई राष्ट्रहिताची आहे की नाही हे त्यांना माहीत नसते. 'श्रीमंत' या शब्दाचा अर्थही त्यांना कळत नसतो. त्यांना हेही कळत नसते की जिथे श्रीमंत असतात तिथे गरीब असणेही अपरिहार्य असते. विशिष्ट नियमांनुसार चालल्यामुळे सर्व लोक श्रीमंत होऊ शकतात असे समजण्याची चूक त्यांनी किती तरी वेळा केलेली आहे. खरे सांगायचे तर श्रीमंती ही गोष्ट विहिरीतील रहाटासारखी आहे. एक रिकामा झाल्यानंतर दुसरा भरतो. तुमच्याजवळ एक रुपया असेल तर त्याचा अधिकार ज्याच्याजवळ एक रुपया नसतो त्याच्यावर चालतो. जर तुमच्यासमोरील माणसाला वा तुमच्या बाजूच्या माणसाला त्या रुपयाची गरज नसेल तर त्या रुपयाला काहीही किंमत राहणार नाही. तुमच्या शेजा-याला रुपयाची किती गरज आहे यावर तुमच्या रुपयाची शक्ती अवलंबून आहे. जिथे गरिबी असते तिथेच श्रीमंतीचे चालू शकते. याचा अर्थ असा होतो की एका माणसाला श्रीमंत व्हायचे असेल तर त्याला आपल्या शेजा-याला गरीब ठेवावे लागते.

सामाजिक अर्थशास्त्राचा अर्थ आहे योग्य वेळी योग्य ठिकाणी आवश्यक आणि सुखदायी वस्तू निर्माण करणे, तिचा साठा करणे आणि तिची अदलाबदल करणे. योग्य वेळी पिकाची कापणी करणारा शेतकरी, योग्य वेळी जुडाई करणारा राज, योग्य पद्धतीने लाकडाचे काम करणारा सुतार, आपले स्वयंपाकघर नीटनेटके

ठेवणारी स्त्री हे सर्व खरे अर्थशास्त्रज्ञ असतात. राष्ट्राची संपत्ती वाढवणारे हेच लोक आहेत. जे शास्त्र याविरोधी असेल त्याला सामाजिक अर्थशास्त्र म्हणता येऊ शकत नाही. अशा अर्थशास्त्रात एक माणूस धातू गोळा करत असतो आणि इतरांना त्या धातूच्या टंचाईत ठेवून स्वतः त्या धातूचा उपयोग करत असतो. आपल्या शेतीचे आणि जनावरांचे किती पैसे मिळतील व तेवढे पैसे मिळाले की आपण पैसेवाले होऊ असा विचार करणारे लोक असतात. आपल्याजवळील रुपयांमध्ये जितके पशू आणि शेती मिळू शकेल तितकीच त्या रुपयांची किंमत आहे असा विचार त्यांच्या मनात येतच नसतो. त्याचबरोबर ते लोक धातूचा - रुपयांचा संग्रह करत असतात. त्या पैशात किती मजूर मिळू शकतील याचाही हिशेब ते करत असतात. ज्या माणसाजवळ सोनेचांदी आणि अन्नधान्य इत्यादी असेल त्याला नोकराची गरज पडणारच. परंतु त्याच्या शेजा-यांपैकी कोणालाही सोन्या-चांदीची वा अन्नधान्याची गरज नसेल तर त्याला नोकर मिळणे कठीण होईल. असे झाले तर त्या श्रीमंत माणसाला स्वतःचा स्वयंपाक स्वतः करावा लागेल, स्वतःचे कपडे स्वतः शिवावे लागतील आणि स्वतः श्रम करून शेतीची लागवड करावी लागेल. अशा परिस्थितीत त्याच्या सोन्याची किंमत त्याच्या शेतातील पिवळ्या दगडांपेक्षा जास्त नसेल. त्याच्या अन्नधान्याची नासाडी होईल कारण तो तेवढे अन्नधान्य खाऊ शकणार नाही. परिणामी त्यालाही कठोर परिश्रम करून जीवननिर्वाह करावा लागेल. अशा अवस्थेत माणसे सोनेचांदी गोळा करणे पसंत करणार नाहीत. खोलवर विचार केला असता लक्षात येते की दुस-या माणसावर अधिकार मिळवणे - आपल्या आरामाकरिता नोकर ठेवता येणे, व्यापारी वा कारागीर यांच्या मेहनतीवर अधिकार मिळवणे असा पैसा मिळवण्याचा अर्थ होतो आणि हा अधिकार शेजा-याची गरिबी जितकी कमी वा अधिक असेल त्याच प्रमाणात प्राप्त होईल. एका सुताराकडून काम करून घेण्याची इच्छा ठेवणारा जर एकच माणूस असेल तर तो देईल

तेवढीच मजुरी त्याला घ्यावी लागेल. असे काम करून घेऊ इच्छिणारे चार-पाच लोक असतील तर जिथे जास्त मजुरी मिळू शकेल तिथे तो सुतार कामाकरिता जाईल. थोडक्यात सांगायचे तर शक्य असेल तितक्या अधिक लोकांना आपल्यापेक्षा गरिबीत ठेवणे असा श्रीमंत होण्याचा अर्थ होतो. अर्थशास्त्रज्ञांची अनेकदा अशी समजूत असते की अशा प्रकारे लोकांना अडचणीत ठेवल्यामुळेच राष्ट्राचा लाभ होत असतो. सर्व लोक कधीही समान होऊ शकत नाहीत. परंतु अयोग्य पद्धतीने लोकांमध्ये गरिबी निर्माण केल्यामुळे जनता दुःखी होते, नैसर्गिक परिस्थितीमुळे अडचण वा संपन्नता निर्माण झाली असेल तर त्यामुळे राष्ट्र सुखी होते.

२/ संपत्तीच्या रक्तवाहिन्या

अशा रीतीने रुपये पैशाचे चलनवलन हे शरीरातील रक्तप्रवाहाप्रमाणे असते. वेगात रक्तसंचार होणे ही गोष्ट एक तर स्वस्थ प्रकृतीचे वा व्यायामाचे लक्षण असते वा लाजिरवाण्या गोष्टीचे अथवा तापाचे चिन्ह असते. शरीरावर आलेला एक प्रकारचा लालिमा ही स्वास्थ्याची खूण असते तर दुस-या प्रकारचा लालिमा रक्तपित्त या रोगाचे चिन्ह असते आणि एका ठिकाणी रक्त गोळा होणे ज्याप्रमाणे शरीराकरिता हानिकारक असते त्याचप्रमाणे एका ठिकाणी संपत्ती गोळा होणे राष्ट्राकरिता हानिकारक असते.

कल्पना करा की एखाद्या जहाजाचे तुकडेतुकडे झाल्यामुळे दोन खलाशी एका निर्जन प्रदेशाच्या काठावर येऊन पडले आहेत. तिथे त्यांना श्रम करून स्वतःकरिता अन्नधान्याची निर्मिती करावी लागते आहे. दोघेही गोडीगुलाबीने एकत्र राहून काम करत असतील तर ते स्वतःकरिता चांगले घर बांधू शकतात, शेत तयार करून शेती करू शकतात आणि भविष्याकरिता काही शिल्लकही ठेवू शकतात. याला आपण खरी संपत्ती म्हणू शकतो आणि दोघेही चांगल्या प्रकारे काम

करत असतील तर त्या संपत्तीत दोघांचाही वाटा समसमान राहील. अशा प्रकारे लागू होणा-या शास्त्राप्रमाणे यांना आपल्या श्रमाचे फळ सम प्रमाणात वाटण्याचा अधिकार आहे. आता कल्पना करा की काही दिवसांनंतर या दोघांपैकी एकाला असमाधान वाटू लागले. त्यामुळे त्यांनी शेती वाटून घेतली आणि ते दोघेही वेगवेगळे काम करू लागले. मग कल्पना करा की एक माणूस अगदी ऐनवेळी आजारी पडला. अशा वेळी स्वाभाविकपणेच तो दुस-या माणसाला मदतीकरिता बोलावील. अशा वेळी दुसरा माणूस म्हणू शकतो की ठीक आहे, मी तुझे इतके काम करून देईन परंतु मला गरज पडली की तुलाही माझे इतकेच काम करून द्यावे लागेल. तुला लिहून द्यावे लागेल की तुझ्या शेतात मी जितके तास काम करीन तितकेच तास मला गरज पडेल तेव्हा तुला माझ्या शेतात काम करावे लागेल. अशीही कल्पना करा की पहिल्या माणसाचा आजार दीर्घ काळ सुरू राहिला आणि त्याला दर वेळी मोबदल्यात काम करण्याचे आश्वासन द्यावे लागले. आता आजारी माणूस जेव्हा बरा होईल तेव्हा त्या दोघांची परिस्थिती कशी असेल? आजारी माणूस बरा होईपर्यंत खाटेवर पडून राहिलेला असल्यामुळे तो बरा होईपर्यंत त्याला त्याच्या कामाचा लाभ मिळू शकला नाही. त्यामुळे दोघेही पूर्वेपेक्षा गरीब झाले असल्याचे आपल्याला आढळून येईल. दुसरा माणूस खूप कष्टाळू आहे अशी जरी कल्पना केली तरी तो जितका वेळ दुस-या माणसाच्या शेतात काम करत होता तितका वेळ तो स्वतःच्या शेतात काम करू शकला नाही हे तर स्पष्टच आहे. परिणामी दोघांची मिळून जेवढी संपत्ती व्हायला पाहिजे होती त्यापेक्षा कमी झाली.

एवढेच नाही, दोघांमधील संबंधांमध्येही बदल झाला. आजारी माणूस दुस-या माणसाचा ऋणको झाला. आता श्रमाची परतफेड केल्यानंतर त्याने अतिरिक्त श्रम केले तरच तो आपले धान्य घेऊ शकतो. आता असे समजा की त्या निरोगी माणसाने करारनाम्याचा उपयोग करण्याचे ठरवले. तो जर असे करील तर तो पूर्णपणे

विश्रांती घेऊ शकतो, आळसात पडून राहू शकतो. त्याची इच्छा असली तर आजारातून उठलेल्या माणसाकडून तो दुसरा करारनामाही लिहून घेऊ शकतो. त्याने असे केले तर त्याने बेकायदेशीर कृत्य केले असे कोणीही म्हणू शकणार नाही. आता तिथे कोणी विदेशी आला आणि त्याने ते दृश्य पाहिले तर त्याला वाटेल की एक माणूस श्रीमंत झाला आहे आणि दुसरा आजारी पडला आहे. एक आळसात पडला आहे, आरामात राहतो आहे आणि दुसरा मजुरी करूनसुद्धा अडचणीत राहतो आहे. या उदाहरणावरून वाचकांच्या लक्षात येईल की दुस-याकडून काम घेतल्यामुळे समाजातील वास्तव संपत्ती कमी होते.

आता दुसरे उदाहरण घेऊ या. समजा तीन माणसांनी मिळून एका राज्याची स्थापना केली आहे आणि ते तिघेही वेगवेगळे राहू लागले आहेत. प्रत्येकाने वेगवेगळे असे पीक काढले की जे तिघांच्याही उपयोगी पडू शकते. असे समजा की या तिघांतील एक माणूस सर्वांचा त्रास कमी व्हावा म्हणून एकाचा माल दुस-याकडे पोहोचवण्याची जबाबदारी घेतो व त्याच्या मोबदल्यात धान्य घेतो. तो माणूस योग्य पद्धतीने सर्वांकरिता मालाची ने-आण करत असेल तर सर्वांचा फायदा होईल. परंतु कल्पना करा की मालाची ने-आण करणारा हा माणूस मध्येच मालाची चोरी करतो आणि नंतर अतिशय अडचणीच्या वेळी तोच माल आडव्यातिडव्या किमतीला त्याच लोकांना विकतो. अशा प्रकारे हळूहळू तो माणूस दोन्ही शेतक-यांना भिकेला लावतो व अखेरीस त्यांना आपले मजूर बनवतो.

वरील उदाहरणात स्पष्ट अन्याय आहे. परंतु आजच्या व्यापाराची हीच परिस्थिती आहे. आपल्याला असेही आढळून येईल की एका माणसाच्या चोरीच्या वर्तनाआधी तिन्ही माणसांची एकत्रित संपत्ती जेवढी भरली असती त्यापेक्षा आता ती कमी भरते. दोन्ही शेतक-यांचे काम कमी झाले, आवश्यक वस्तू न मिळाल्यामुळे दोन्ही शेतक-यांना आपल्या श्रमाचे पूर्ण फळ मिळू शकले नाही. शिवाय चोरी करणा-या

त्या दलालाच्या हाती जो माल लागला त्याचाही पूर्ण सदुपयोग झाला नाही.

अशा प्रकारे गणिताने (सांख्यिकी) स्पष्ट हिशेब करून आपण संपूर्ण राष्ट्राची संपत्ती मोजू शकतो. ती संपत्ती मिळवण्याच्या साधनांवर ते राष्ट्र श्रीमंत आहे की नाही ते ठरेल. एखाद्या राष्ट्राजवळ अमुक इतके पैसे आहेत म्हणून ते श्रीमंत आहे असे म्हणता येत नाही. एखाद्या माणसाजवळ संपत्ती असणे ज्याप्रमाणे त्याच्या चिकाटीचे, चातुर्याचे आणि प्रगतीशीलतेचे चिन्ह असू शकते त्याप्रमाणे ते हानिकारक भोगविलास, अत्याचार आणि लांडीलबाडीचेही चिन्ह असू शकते. केवळ नीतीच आम्हाला अशा प्रकारे हिशेब करणे शिकवते. एक संपत्ती अशी असते की जी दहापट होऊ शकते आणि एक संपत्ती अशी असू शकते की जी एखाद्याच्या हाती पडताच दहापट संपत्तीचा नाश करते.

तात्पर्य हे की नीतिअनीतीचा विचार केल्याशिवाय संपत्ती गोळा करण्याचे नियम सांगणे ही गोष्ट केवळ माणसाच्या अहंपणाची निशाणी आहे. स्वस्तात स्वस्त विकत घेऊन महगात महाग विकण्याच्या नियमासारखी माणसासाठी लाजिरवाणी गोष्ट कोणतीही नाही. 'स्वस्तात-स्वस्त' घेणे ठीक आहे परंतु भाव कमी कसे झाले? आग लागून लाकूडफाटा जळाल्यामुळे कोळसा झाला तर तो स्वस्त होऊ शकतो. भूकंप झाल्यामुळे पडलेल्या घरांच्या विटा स्वस्त होऊ शकतात. परंतु यामुळे आग आणि भूकंपासारख्या दुर्घटना मानवजातीकरिता हितकारक आहेत असे कोणीही म्हणू शकत नाही. अशाच प्रकारे महागात महाग विकणे ठीक आहे परंतु वस्तू महाग झाली कशी? तुम्हाला भाकरीचे चांगले पैसे मिळाले परंतु त्याकरिता एखाद्या मरणासन्न व्यक्तीने शेवटच्या दमड्याही तुम्हाला दिल्या आहेत का? वा तुम्ही ती भाकरी अशा सावकाराला तर दिली नाही जो उद्या तुमचे सर्वस्व हिरावून घेईल? अथवा अशा शिपायाला तर दिली नाही जो उद्या तुमच्या बँकेवर दरोडा टाकेल? शक्य आहे की यातील

एकाही प्रश्नाचे उत्तर तुम्ही आताच देऊ शकणार नाही कारण तुम्हाला त्याची माहिती नाही. परंतु तुम्ही तुमची भाकरी योग्य किंमतीला नीतिपूर्वक विकली की नाही हे तर तुम्ही सांगू शकता? वस्तू विकताना योग्य न्याय होण्याची काळजी तुम्ही घेतली पाहिजे. तुमच्या कामामुळे कोणालाही दुःख होणार नाही एवढे लक्षात ठेवून त्याप्रमाणे वर्तन करणे तुमचे कर्तव्य आहे.

आपण पाहिले आहे की लोकांचे किती श्रम विकत घेता येऊ शकते यावर पैशाची किंमत अवलंबून असते. श्रम फुकट मिळत असतील तर पैशाची गरजच राहणार नाही. पैशाशिवायही लोकांचे श्रम मिळू शकतात याची उदाहरणे सापडतात आणि पैशाच्या शक्तीपेक्षा नैतिकतेची शक्ती अधिक काम करत असल्याची उदाहरणे आपण आधीही पाहिलेली आहेत. आपण पाहिले आहे की जिथे पैसा काम करत नाही तिथे सद्‌गुण काम करतात. इंग्लंडमध्ये अनेक ठिकाणी लोकांना पैशाने भुलवता येऊ शकत नाही.

माणसाकडून काम करून घेण्याची शक्ती पैसा आहे हे जरी आपण मान्य केले तरी माणूस जेवढा चतुर आणि नीतिमान असेल तेवढ्याच प्रमाणात त्याच्या संपत्तीत वाढ होते असेही आपल्याला दिसते. अशा प्रकारे विचार केला असता खरी संपत्ती सोनेचांदी नसून स्वतः माणूसच असल्याचे आपल्या लक्षात येते. संपत्तीचा शोध धरतीच्या पोटात नाही तर माणसाच्या हृदयात घ्यायला पाहिजे. हे जर बरोबर असेल तर लोकांचे तन, मन आणि आत्मसन्मान यांना जपले पाहिजे. अशीही एखादी वेळ येऊ शकते जेव्हा इंग्लंड गोवळकोंडा येथून आणलेले हिरे सजवून आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याऐवजी ग्रीसमधील एका सुप्रसिद्ध व्यक्तीच्या वचनानुसार आपल्या नीतिमान पुरुषांचे प्रदर्शन करून सांगेल, 'हीच आमची संपत्ती आहे.'

३/ जशास तसेचा न्याय

असे म्हणतात की ख्रिश्चन युगाच्या म्हणजे इसवी सनाच्या काही शतकांपूर्वी एक ज्यू व्यापारी होऊन गेला. त्याचे नाव सालोमन होते. या ज्यू व्यापा-याने भरपूर संपत्ती आणि पैसा कमावला होता. त्याची नीतिवचने आजही युरोपमध्ये प्रसिद्ध आहेत. व्हेनिसमधील लोक त्याला एवढे मानत होते की त्यांनी त्याचा पुतळा उभारला. त्याची सुभाषिते आजही लोकांच्या आठवणीत आहेत हे खरे असले तरी फार कमी लोक त्यानुसार आचरण करतात. उदाहरणार्थ तो म्हणतो : 'जे लोक खोटे बोलून पैसा कमावतात ते अहंकारी असतात आणि तेच त्यांच्या मृत्यूचे चिन्ह आहे.'; अशाच अर्थाच्या आणखी एका नीतिवचनात तो म्हणतो 'दुष्टपणाने मिळवलेल्या संपत्तीने कोणताही लाभ होऊ शकत नाही. उलटपक्षी सत्यामुळे मृत्यूच्या मुखातून आपण वाचत असतो.' या दोन्ही नीतिवचनांमध्ये 'अन्यायाने मिळवलेल्या संपत्तीचे सार म्हणजे मृत्यू' असे सालोमनने सांगितलेले आहे. या युगात आपण इतके खोटे बोलतो आणि इतका अन्याय करतो की सामान्यपणे खोटेपणा आणि अन्याय या शब्दांना अर्थच राहत नाही. उदाहरणार्थ खोट्या जाहिराती देणे आणि आपला माल खपावा म्हणून लोकांना भ्रम होईल असे लेबल लावणे इत्यादी.

तो सूज्ञ माणूस पुढे म्हणतो, 'आपली संपत्ती वाढवण्याकरिता जो माणूस गरिबांचा छळ करतो तो अखेरीस दारोदारी भीक मागेल.' यापुढे जाऊन तो म्हणतो, 'गरीब गरीब आहे म्हणून त्यांना छळू नका. तसेच व्यापारात दुःखीकष्टी माणसावर अन्याय करू नका, कारण जे लोक गरिबांचा छळ करतील त्यांचा ईश्वर छळ करील.' परंतु आजकाल तर व्यापारात मेलेल्या माणसालाच ठोकरून लावले जाते. जर कोणी संकटात सापडला तर त्याच्या संकटाचा लाभ घेण्याकरिता लोक टपलेले असतात. हमरस्त्यावर लोकांची लूटमार करणारा डाकू श्रीमंतांना लुटत असतो तर व्यापारी गरिबांना लुटत असतो.

सालोमन नंतर आपल्या नीतिवचनांमध्ये म्हणतो, 'श्रीमंत आणि गरीब दोघेही सारखे आहेत. ईश्वरच त्यांना उत्पन्न करणारा आहे, तोच त्यांना ज्ञान देतो. श्रीमंतांचे गरिबांशिवाय आणि गरिबांचे श्रीमंतांशिवाय चालू शकत नाही. एकमेकांची गरज दोघांनाही नेहमीच पडत असते त्यामुळे कोणी कोणालाही उच्च म्हणू शकत नाही आणि नीचही म्हणू शकत नाही. परंतु जेव्हा हे दोघेही आपली समता विसरतात आणि ईश्वरच आपल्याला ज्ञान देणारा आहे या गोष्टीचेही त्यांना भान राहत नाही तेव्हा त्याचे विपरीत परिणाम होतात.

धन नदीप्रमाणे आहे. नदी सतत समुद्राकडे म्हणजे खालच्या पातळीकडे वाहत असते. त्याच प्रकारे जिकडे गरज असेल तिकडे संपत्तीने गेले पाहिजे. परंतु ज्याप्रमाणे नदीच्या प्रवाहाची दिशा बदलत असते त्याचप्रमाणे संपत्तीच्या प्रवाहाची दिशासुद्धा बदलली पाहिजे. कितीतरी नद्या इकडेतिकडे वाहू लागतात आणि आणि त्यांचे पाणी आजूबाजूच्या प्रदेशात साठून तिथे विषारी वायू निर्माण होतो. याच नद्यांवर बांध घालून आवश्यकता असेल तिकडे त्यांचे पाणी नेले तर त्याच पाण्याने जमीन सुपीक बनू शकते व आजूबाजूचे हवामानही प्रसन्न होते. अशाच प्रकारे संपत्तीचा हवा तसा व्यवहार सुरू झाला तर वाईटपणा वाढतो, गरिबी वाढते. थोडक्यात सांगायचे तर संपत्ती विषतुल्य होऊन जाते. परंतु त्याच संपत्तीची गती आणि दिशा निश्चित करण्यात आली, नियमानुसार तिच्यासंबंधी व्यवहार करण्यात आले तर बांध घातलेल्या नदीप्रमाणे ती संपत्ती सुखकर होते.

संपत्तीच्या गतीचे नियंत्रण करणा-या नियमांकडे अर्थशास्त्रज्ञ दुर्लक्ष करतात. त्यांचे शास्त्र केवळ संपत्ती गोळा करण्याचे शास्त्र आहे. परंतु संपत्ती तर अनेक प्रकारे गोळा करता येऊ शकते. युरोपमध्ये एक काळ असा होता की लोक श्रीमंतांना विष देऊन मारून टाकायचे आणि स्वतः त्या संपत्तीचे मालक व्हायचे. आजकाल गरिबांकरिता जे खाद्यपदार्थ बनवण्यात येतात त्यांमध्ये व्यापारी भेसळ करतात. जसे दुधात टाकणखार, कणकेत बटाटे, कॉफीत चिकोरी,

लोण्यात चरबी इत्यादी. विष देऊन श्रीमंत होण्यासारखेच हे आहे. याला आपण श्रीमंत होण्याची कला वा विज्ञान म्हणू शकतो काय?

परंतु अर्थशास्त्रज्ञ केवळ फसवणुकीच्या मार्गाने श्रीमंत होण्याचा मार्गच सांगतात असे समजू नये. त्यांच्या बाजूने असे सांगता येईल की कायद्यानुसार श्रीमंत होण्याचा मार्गच ते सांगत असतात. परंतु या काळात अनेक गोष्टी विधिसंगत असल्या तरी त्या न्याय्य असतातच असे नाही. त्यामुळे नीतिनियमानुसार धनसंपत्ती गोळा करणे हीच उचित गोष्ट असते आणि न्यायानेच पैसा कमावणे उचित असेल तर न्याय अन्यायाची विवेकबुद्धी निर्माण करणे हे माणसाचे पहिले कर्तव्य ठरते. केवळ देवघेवीच्या व्यावहारिक नियमानुसार व्यापार करणे पुरेसे नाही. ही गोष्ट तर मासे, लांडगे, उंदीर वगैरेही करत असतात. मोठे मासे लहान माशांना खातात आणि उंदीर लहान प्राण्यांना आणि किड्यांना खातात आणि लांडगा माणसालासुद्धा खाऊन टाकतो. त्यांचा हाच नियम आहे, दुसरा नियम त्यांना माहीत नाही. परंतु ईश्वराने माणसाला समंजसपणाची शक्ती दिली आहे, न्यायबुद्धी दिली आहे. इतरांचे भक्षण करून, त्यांना फसवून, लोकांना भिकारी बनवून माणसाने श्रीमंत व्हायला नको.

अशा परिस्थितीत मजुरांना न्याय्य मजुरी देण्याची पद्धती कोणती ते आता आपण पाहू.

आम्ही आधीच सांगितले आहे की मजुराने जितके श्रम आपल्याकरिता केले असतील तितकेच श्रम आपण त्याच्याकरिता त्याला आवश्यकता असेल तेव्हा करणे हीच मजुराची योग्य मजुरी असू शकते. जर त्याला मोबदल्यात कमी श्रम, कमी काम मिळत असेल तर आपण त्याला कमी मजुरी देतो, जास्त मिळत असेल तर जास्त मजुरी देतो.

व्यवहारात जेव्हा दोन माणसे एकच काम करण्याकरिता तयार असतात आणि एकाच माणसाकडून ते काम करून घ्यायचे असते तेव्हा दोन माणसे परस्परांशी स्पर्धा करतात व जो ते काम

करण्याकरिता तयार होतो त्याला कमी मजुरी मिळते. परंतु जेव्हा दोन लोकांना काम करून घ्यायचे असते आणि काम करणारा एकच असतो तेव्हा ते काम करून घेणा-यांमध्ये स्पर्धा होऊन काम करणा-याला अधिक मजुरी मिळते. अन्यायाच्या या दोन बिंदूंमध्ये कुठेतरी न्यायाचा बिंदू सापडेल.

एखादा माणूस मला एक रुपया उधार देत असेल आणि काही विशिष्ट मुदतीनंतर मी तो रुपया परत करणार असेन तर मला त्या रुपयावर व्याज द्यावे लागते. अशाच प्रकारे कोणी माझ्याकरिता आज श्रम करत असेल तर मला त्याला केवळ तेवढेच श्रम नाही तर व्याज म्हणून अजून काही श्रम द्यावे लागतील. आज कोणी माझ्याकरिता एक तास काम करत असेल तर मला त्याच्याकरिता नंतर एक तास पाच मिनिटे अथवा त्याहून जास्त वेळ काम करावे लागेल.

आता दोन माणसे जर एकच काम करण्याकरिता तयार असतील आणि मी जर त्यातील एकाला अर्ध्या मजुरीवर काम दिले तर त्याला अर्धपोटी रहावे लागेल आणि दुसरा मजूर कामाशिवाय राहील आणि निवडलेल्या मजुराला जरी मी पूर्ण मजुरी दिली तरी दुसरा माणूस कामाशिवाय राहीलच. अशा परिस्थितीत माझ्या मजुरावर अर्धपोटी राहण्याची वेळ येणार नाही आणि मी माझ्या पैशाचा न्याय्य उपयोग केलेला असेल. मी जर माझ्या माणसाला योग्य मजुरी दिली तर मला भोगविलासावर उधळण्याकरिता अनावश्यक संपत्ती गोळा करता येणार नाही आणि जगातील गरीबीतही भर घातली जाणार नाही. ज्या मजुराला माझ्याकडून काम मिळेल तो आपल्या हाताखालच्या मजुरांशी न्यायाने वागेल. अशा प्रकारे न्यायाचा झरा आटणार नाही. उलट पुढे जात असताना तो अजून फोफावेल. आणि अशा प्रकारची न्यायभावना असलेल्या राष्ट्राची भरभराट होऊन ते सुखी होईल.

स्पर्धा राष्ट्राकरिता हितावह असते ही अर्थशास्त्राची धारणा चुकीची असल्याचे अशा प्रकारे आपल्या लक्षात येते. त्यांचे म्हणणे

आहे की जसजशी स्पर्धा वाढत जाते तसतसे राष्ट्र समृद्ध होत जाते. वास्तवात हा भ्रम आहे. स्पर्धेचा उद्देश असतो मजुरीचे दर कमी करणे.

स्पर्धेमुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होत जातात आणि गरीब अजून गरीब. यामुळे ही स्पर्धा दीर्घ काळात राष्ट्राला विनाशाकडेच ढकलेल. कामगाराला त्याच्या क्षमतेप्रमाणे योग्य पारिश्रमिक मिळाले पाहिजे असाच नियम असला पाहिजे. असे झाले तरी एक प्रकारची स्पर्धा कायम राहणारच आहे. परंतु या स्पर्धेमुळे लोक सुखी आणि सूज्ञ होतील कारण काम मिळण्याकरिता लोकांना परस्परांशी स्पर्धा करून एकमेकांच्या मजुरीचा दर कमी करावा लागणार नाही, तर कामातील कौशल्य वाढवावे लागेल. शासकीय नोकरीचे आकर्षण वाटण्याचे कारण हेच आहे. तिथे पदाप्रमाणे पगार ठरलेला असतो. विशिष्ट पदाकरिता काम करणा-या उमेदवाराला परस्परांशी स्पर्धा करून कमी पगारावर काम करण्याची कबुली द्यावी लागत नसते. तिथे स्पर्धा केवळ कौशल्यात असते. नोकरीकरिता अर्ज करणारा कमी पगाराविषयी बोलत नसतो तर आपल्यामध्ये अधिक कौशल्य असल्याचे व आपण अधिक चांगले काम करणारे आहोत एवढेच त्याला सिद्ध करावे लागत असते. सैन्यात आणि आरमारातही याच नियमाचे पालन करण्यात येते. यामुळे तिथे फार कमी गोंधळ आणि अनीती असल्याचे आढळते. परंतु व्यापारात आणि कारखान्यांमध्ये दुष्ट स्पर्धा सुरू असते. परिणामी तिथे फसवणूक, लुच्चेगिरी, चोरी अशा गोष्टी वाढतात. कारखान्यांमध्ये कमी प्रतीचा माल निर्माण केला जातो. व्यापा-याला पैसा खाण्याची इच्छा असते, मजुराला लबाडी करण्याची आणि ग्राहकाला मधूनच हात मारण्याची इच्छा असते. अशा प्रकारे व्यवहाराची नासाडी होते. लोकांमध्ये कटकटी होत राहतात. गरिबीचा जोर वाढतो, संप वाढतात, सावकार ठक बनतात, ग्राहक नीतीनुसार वागत नाहीत. एका अन्यायातून दुस-या अन्यायाची निर्मिती होते. अखेरीस सावकार, व्यापारी, ग्राहक सर्व दुःखी होतात

व सर्वांचा विनाश होतो. ज्या राष्ट्रात अशा प्रथा असतात ते राष्ट्र अखेरीस दुःखी होते आणि त्याची संपत्तीच विषमय होते.

यामुळेच विद्वान लोक म्हणतात, 'जिथे संपत्तीच परमेश्वर असते तिथे ख-या ईश्वराची भक्ती कोणीही करत नाही.'

अर्थशास्त्र हे विज्ञान आहे हे मान्य करून त्याचे विचार मान्य केल्यामुळे मानवी बुद्धीचे जसे स्खलन झाले तसे स्खलन इतर कशानेही झाल्याचे मानवी इतिहासात दुसरे उदाहरण नाही. अशा प्रकारे राष्ट्रधर्माचे पद्धतशीरपणे उल्लंघन केल्याचे दुसरे एकही उदाहरण इतिहासाला माहीत नाही. पैसा आणि ईश्वर हे परस्परविरोधी आहेत आणि गरिबाच्या घरातच ईश्वराचा वास असतो असे इंग्रज तोंडाने सांगत असले तरी व्यवहारात ते पैशाला सर्वोच्च स्थान देतात. आपल्या श्रीमंत माणसांची गणना करून ते खूश होतात. झटपट श्रीमंत होण्याचे नियम अर्थशास्त्रज्ञ सांगतात व ते शिकून लोकांनी लगेच श्रीमंत होण्याचा प्रयत्न करावा असे अपेक्षितात. खरे शास्त्र न्यायबुद्धी आहे. कोणत्याही परिस्थितीत न्याय कसा करावा, नीतीने कसे वागावे हेच ख-या शास्त्राचे लक्षण असते. जे राष्ट्र हे शास्त्र शिकते तेच सुखी होते. इतर सर्व व्यर्थ आहे. 'विनाशकाले विपरीत बुद्धीप्रमाणे'. कसेही करून पैसे मिळवा असे लोकांना शिकवणे म्हणजे त्यांना कुशिक्षण देण्यासारखे आहे.

४/ सत्य काय आहे?

गेल्या तीन प्रकरणांमध्ये आपण पाहिले की अर्थशास्त्रज्ञांनी जे सर्वसामान्य नियम सांगितले ते चुकीचे आहेत. त्या नियमांप्रमाणे आचरण केल्यामुळे व्यक्ती आणि समाज दोघेही दुःखी होतात. गरीब अधिक गरीब होतात आणि श्रीमंत अधिक श्रीमंत आणि तरीही दोघांपैकी एकही सुखी होत नाही.

अर्थशास्त्री माणसाच्या आचरणाचा विचार न करता अधिक पैसा

गोळा करण्यालाच प्रगती समजतात व जनतेच्या सुखाचा आधार पैसाच आहे असे मानतात. त्यामुळे कलाकौशल्याच्या वाढीने जितका अधिक पैसा मिळवता येईल तितका पैसा मिळवावा असे त्यांचे सांगणे असते. अशा प्रकारच्या विचारांच्या प्रचारामुळे इंग्लंड आणि इतर राष्ट्रांमध्ये कारखाने वाढले आहेत. अनेक लोक शहरात गोळा होतात आणि शेतीवाडी सोडून देतात. ग्रामीण भागातील स्वच्छ, सुंदर वारा सोडून कारखान्यातील घाणेरड्या वा-यात रात्रंदिवस श्वासोच्छ्वास करण्यात सुख मानतात. यामुळे जनता दुर्बल होऊ लागली आहे, लोभ वाढू लागला आहे आणि अनैतिकता पसरू लागली आहे. अनीती दूर करण्यासंबंधी आपण बोलू लागतो तेव्हा ही अनीती दूर होणे शक्य नाही. अडाणी लोकांना एकदम ज्ञान प्राप्त होऊ शकत नसल्यामुळे जसे सुरू आहे तसेच सुरू राहू द्या असे बुद्धिमान लोक सांगू लागतात. असा युक्तिवाद करत असताना गरिबांच्या या अधोगतीकरिता श्रीमंत लोकच जबाबदार आहेत ही गोष्ट मात्र ते विसरतात. श्रीमंतांच्या ऐषोआरामाकरिता हे गरीब लोक गुलामांप्रमाणे रात्रंदिवस राबत असतात. काही शिकण्याकरिता वा चांगले काम करण्याकरिता त्यांना वेळच मिळत नाही. या श्रीमंतांना पाहून गरीबही श्रीमंत होण्याचा प्रयत्न करू लागतात. परंतु त्यांना श्रीमंत होता आले नाही तर ते दुःखी होतात, त्यांचा संताप होतो. मग त्यांचा तोल जातो व ते भ्रष्टाचाराच्या बळावर पैसा मिळवण्याचा व्यर्थ प्रयत्न करू लागतात. अशा प्रकारे पैसा आणि मेहनत या दोन्ही गोष्टींमधून काहीही निष्पन्न होत नाही असे दिसल्यानंतर आपल्या सर्व कौशल्याचा उपयोग लोकांची फसवणूक करण्यासाठी ते करू लागतात.

वास्तवात खरे श्रम तेच असतात ज्यामुळे काही तरी उपयोगी वस्तू निर्माण होते. उपयोगी ते असते ज्यामुळे मानवजातीचे भरणपोषण होते आणि भरणपोषण त्याला म्हणतात ज्यामुळे माणसाचे पोट भरते, अथवा नीतीच्या मार्गावर राहून आजीवन सत्कर्म करत राहण्याकरिता प्रेरणा मिळते. अशा प्रकारे विचार केल्यानंतर

मोठमोठ्या योजनाही बेकार वाटू शकतील. कारखाने उघडून श्रीमंत होण्याचा मार्गही पापाचा मार्ग वाटू शकेल. अनेक लोक भरपूर संपत्ती गोळा करतात परंतु त्यापैकी काहींनाच त्या संपत्तीचा सदुपयोग करता येतो. गोळा केलेल्या ज्या संपत्तीमुळे जनता विनाशाकडे ढकलली जाते त्या संपत्तीचा या जगात कोणताही उपयोग नाही. आज जे लोक करोडपती आहेत ते लोक मोठमोठ्या अनैतिक युद्धांमुळे करोडपती झाले आहेत. वर्तमान काळातील अधिकांश युद्धांचे मूळ कारण पैशाचा लोभच असल्याचे दिसते.

काही लोक म्हणतात की इतरांना सुधारणे, ज्ञान देणे अशक्य असते. त्यामुळे आपल्याला योग्य वाटेल त्या पद्धतीने राहण्यात आणि संपत्ती गोळा करण्यात काहीही गैर नाही. परंतु असे म्हणणारे लोक स्वतःच नैतिकतेचे पालन करत नसतात. नैतिकतेचे पालन करणारा माणूस लोभाला बळी पडत नसतो. तो आधी आपल्या मनाला नियंत्रणात ठेवतो, सन्मार्गावरून विचलीत होत नाही व आपल्या कार्याने इतरांना प्रभावित करतो. समाजाचे घटक असलेली माणसे जर अनैतिक असतील तर समाज नैतिक कसा असू शकेल? आपण स्वतः स्वैराचार करून त्याचवेळी आपल्या शेजा-यांना दुर्वर्तनाकरिता धारेवर धरू लागलो तर त्याचे परिणाम कसे चांगले होतील?

अशा रीतीने विचार केला असता दिसून येते की पैसा केवळ साधनमात्र आहे. आणि तो जसा आपल्याला सुखी करू शकतो तसाच तो आपल्या दुर्दशेसही कारणीभूत ठरू शकतो. चांगल्या माणसाच्या हातात जर तो गेला तर त्याचा उपयोग शेती करण्याकरिता आणि पीक काढण्याकरिता होतो. निरागस शेतकरी श्रम करून समाधानात राहतात व त्यामुळे राष्ट्रही सुखी होते. उलटपक्षी वाईट माणसाच्या हाती पैसा गेला तर त्याचा उपयोग बंदुकीची दारू तयार करणा-या कारखान्याकरिता होईल व त्यामुळे गोळाबारूद तयार करणा-या राष्ट्राचा व ज्यांच्यावर त्याचा प्रयोग होईल त्यांचाही नाश होईल.

त्यामुळे खरा माणूस हीच खरी संपत्ती असते. ज्या देशात नीती असते तो देश धनवान असतो. हा काळ भोगविलासाचा नाही. प्रत्येक माणसाने शक्य तितके श्रम केले पाहिजेत. मागील उदाहरणात आपण पाहिले की जिथे एक माणूस आळशी असतो तिथे दुस-याला दुप्पट मेहनत करावी लागते. इंग्लंडमध्ये पसरलेल्या बेकारीचे हेच कारण आहे. जवळ पैसा असल्यामुळे किती तरी लोक उपयुक्त श्रम करत नाहीत. त्यामुळे इतरांना त्यांच्याकरिता श्रम करावे लागतात. हे श्रम उपयोगी नसल्यामुळे श्रम करणा-याचा त्यामुळे कोणताही लाभ होत नाही. उलट त्यामुळे राष्ट्राची संपत्ती कमी होते. वरवर पाहता लोकांना काम मिळते आहे जरी असे वाटत असले तरी खोलवर पाहता अनेक लोक बेकार बसून असल्याचे आपल्याला दिसेल. शिवाय यामुळे मत्सरही वाढतो आणि असंतोषही मुळे धरू लागतो. अखेरीस धनवान-गरीब, मालक-मजूर हे सर्व आपली मर्यादा सोडून देतात. ज्याप्रमाणे मांजर आणि उंदीर यांच्याध्ये कायम शत्रुत्व असते त्याचप्रमाणे श्रीमंत आणि गरिबात, मालक आणि मजुरात शत्रुत्व निर्माण होते आणि माणूस माणूस न राहता पशुत्वाच्या पातळीवर पोहोचतो.

५/ सारांश

अशा प्रकारे रस्किनने लिहिलेल्या या महान पुस्तकाचा खुलासा आम्ही केला आहे. हे लेख अनेक वाचकांना निरस वाटू शकतात, परंतु ज्यांनी हे एकदा वाचले त्यांनी ते परत वाचावेत अशी शिफारस आम्ही करतो. 'इंडियन ओपिनियनचे' सर्व वाचक हे लेख वाचतील आणि त्यावर विचार करून त्यानुसार आचरण करतील अशी अपेक्षा कदाचित अवास्तव ठरेल. परंतु थोडेसे वाचक जरी या लेखांचा अभ्यास करून त्यांचे मनन करतील तर आमचे श्रम सार्थकी लागले असे आम्ही समजू. असे जरी झाले नाही तरी रस्किनच्या शेवटच्या

परिच्छेदाप्रमाणे आम्ही निदान आमचे कर्तव्य पार पाडले असे म्हणता येईल. त्यातच फळाचा समावेश आहे. याच कारणामुळे आम्हाला नेहमीच समाधान वाटत राहणे उचित आहे.

रस्किनने ज्या गोष्टी आपल्या भावंडांकरिता - इंग्रजांकरिता - लिहिल्या त्या गोष्टी इंग्रजांना एक टक्का लागू होत असतील तर आपण भारतवासीयांकरिता हजार टक्के लागू होतात. भारतात नवीन विचारांचा प्रसार होतो आहे, पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या आजकालच्या मुलांमध्ये उत्साहाचा संचार झालेला आहे. ही चांगली गोष्ट आहे. परंतु उत्साहाचा चांगला उपयोग केला तर चांगला आणि वाईट उपयोग केला तर वाईट परिणाम होतो. एकीकडून घोषणा होते आहे की स्वराज्य मिळवले पाहिजे आणि दुसरीकडून घोषित करण्यात येत आहे की इंग्रजांप्रमाणे कारखाने उघडून पैसा मिळवला पाहिजे.

परंतु स्वराज्य म्हणजे काय हे आपल्याला क्वचितच कळलेले असते. उदाहरणार्थ नाताळला स्वातंत्र्य मिळालेले आहे परंतु नाताळमध्ये जे सुरू आहे तेच आम्ही करू लागलो तर ते नरकराज्य होईल. नाताळचे लोक निग्रोंना चिरडत आहेत व भारतीयांचा जीव घेत आहेत. स्वार्थापायी आंधळे होऊन ते स्वार्थराज्याचा उपभोग घेत आहेत. काही कारणामुळे सर्व भारतीय आणि निग्रो नाताळमधून निघून गेले तर तेथील गोरे परस्परांशी भांडतील आणि स्वतःचा विनाश ओढवून घेतील.

नाताळसारखे स्वराज्य आपल्याला नको असेल तर ट्रान्सवालसारखे स्वराज्य आपल्याला हवे आहे काय? जनरल स्मट्स तेथील नायकासारखे आहेत. ते आपल्या लेखी अथवा तोंडी अभिवचनांचे पालन करत नाहीत. त्यांचे खाण्याचे आणि दाखवण्याचे दात वेगवेगळे असतात. इंग्रज त्यांना कंटाळले आहेत. पैसा वाचवण्याच्या निमित्ताने त्यांनी इंग्रजांना पोलीसदलातून काढून टाकले आहे आणि त्यांच्या ठिकाणी डच लोकांची भरती केली. परंतु यामुळे अखेरीस डचही सुखी होतील असे आम्ही मानत नाही. ज्या

लोकांची स्वार्थावर नजर असते त्या लोकांना लूट करण्याकरिता जेव्हा 'बाहेरचे लोक' उरणार नाहीत तेव्हा ते स्वार्थी लोक स्वतःच्याच लोकांना लुटण्याकरिता सहजगत्या तयार होतील.

जगाच्या सर्व भागांकडे दृष्टी टाकली तर आपल्याला दिसून येते की ज्या राज्याला स्वराज्य असे म्हणतात ते राज्य जनतेच्या सुखाकरिता आणि प्रगतीकरिता पुरेसे नसते. एक साधे उदाहरण घेऊन ही गोष्ट आम्ही सिद्ध करू शकतो. लुटारूंच्या टोळीला स्वराज्य देण्यात आले तर काय परिणाम होतील हे सर्वांना कळते. अशा लुटारूंनाही जर चांगल्या माणसाच्या म्हणजे जो स्वतः लुटारू नाही अशा माणसाच्या अखत्यारीत ठेवण्यात आले तरच ते सुखी होतील. संयुक्त राज्य अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्स ही सर्व मोठमोठी शक्तिसंपन्न राष्ट्रे आहेत परंतु ते खरोखरच सुखी देश आहेत हे समजण्यास काहीही आधार नाही.

स्वराज्याचा खरा अर्थ आत्मनिग्रह असा आहे. जो माणूस नैतिकतेचे पालन करतो तोच आत्मनिग्रह करू शकतो. जो माणूस कुणाचीही फसवणूक करत नाही, असत्याचरण करत नाही आणि आपल्या मुलांबद्दलचे, पत्नीबद्दलचे आणि आईवडिलांबद्दलचे कर्तव्य पार पाडतो तो माणूस नैतिकतेच्या नियमानुसार आचरण करणारा आहे असे म्हणता येईल. असा माणूस कुठेही राहत असला तरी त्याला सदैव स्वराज्याचा आनंद मिळत असतो. ज्या देशातील बहुतांश लोक असे असतात त्या देशाला स्वराज्य मिळालेले आहे असेच समजले पाहिजे.

एका देशातील लोकांनी दुस-या देशातील लोकांवर राज्य करणे सामान्यपणे वाईट समजले जाते. त्यामुळे ब्रिटिशांचे भारतातील राज्य ही निंदनीय गोष्ट आहे. परंतु भारतातून ब्रिटिश निघून गेले तर आपण फार मोठी कामगिरी केली या भ्रमात आपण राहू नये. ब्रिटिशांच्या आपल्या देशातील राज्याकरिता आपण स्वतः कारणीभूत आहोत. आपल्यातील फूट, आपली अनैतिकता आणि अज्ञान

याकरिता कारणीभूत आहेत. आपण जर या दोषांवर मात केली तर एक बोटही न उचलता ब्रिटिश भारतातून निघून जातील. एवढेच नाही तर आपणही ख-या स्वराज्याचा उपभोग घेऊ शकू.

बॉम्ब पडलेले पाहून अनेक लोक खूश होतात. परंतु हे अडाणीपणाचे, अज्ञानाचे चिन्ह आहे. सर्व इंग्रज अशा प्रकारे मारले गेले तर खुनी लोक भारताचे शासक होतील. परंतु भारत मात्र गुलामच राहील, केवळ मालक बदलेल. आज इंग्रजांवर बॉम्ब फेकण्यात येतात, उद्या इंग्रज गेल्यानंतर त्याचे लक्ष्य भारतीय होतील. फ्रांसच्या गणतंत्राच्या अध्यक्षाचा खून करणारा फ्रेंचच होता. अमेरिकेचे अध्यक्ष क्लिव्हलॅन्ड यांचा खून करणारा अमेरिकनच होता. त्यामुळे घाईघाईत अविचाराने आपण पाश्चात्यांचे अंधानुकरण करू नये.

ज्याप्रमाणे पापकर्म करून - इंग्रजांना मारून - स्वराज्य मिळू शकत नाही त्याचप्रमाणे भारतात मोठमोठे कारखाने उभारूनही ते मिळू शकत नाही. असे केल्यामुळे आपल्या खजिन्यात कदाचित सोन्याचांदीची भर पडू शकेल परंतु त्यामुळे स्वराज्याची संस्थापना काही होऊ शकणार नाही ही गोष्ट रस्किनने पूर्णपणे सिद्ध केली आहे. पाश्चात्य संस्कृती अजून शैशवावस्थेतच आहे, ती उणीपुरी ५०-१०० वर्षांची असावी आणि तरीही तिच्यामुळे आज युरोपची अवस्था वर्णसंकरासारखी झाल्याचे दिसते आहे. युरोपसारखी भारताची अवस्था कधीही होऊ नये एवढीच आमची प्रार्थना आहे. युरोपमधील राष्ट्रे परस्परांवर हल्ला करण्याच्या संधीची वाट पाहत बसलेले आहेत. आज ते शांत बसले आहेत कारण त्यांची तयारी सुरू आहे. कधीकाळी भयंकर आग पेटेल तेव्हा युरोपमध्येही नरक दिसेल. प्रत्येक युरोपिअन राष्ट्र गौरेतर जमातींकडे, काळ्या लोकांकडे स्वाभाविक भक्ष्य म्हणून पाहत असते. माणसाच्या अंतःकरणात जेव्हा हावरटपणा भरलेला असतो तेव्हा आणखी कशाची अपेक्षा करता येऊ शकते? ज्याप्रमाणे मांसाच्या एखाद्या तुकड्यावर कावळे तुटून

पडतात त्याप्रमाणे युरोपिअन लोक नवीन प्रदेशांवर तुटून पडतात. प्रचंड प्रमाणात उत्पादन करणा-या त्यांच्या कारखान्यांमुळे असे घडते असे मानण्यास आमच्याजवळ कारणे आहेत असे आम्हाला वाटते.

भारताला स्वराज्य मिळायलाच हवे ही सर्व भारतीयांची मागणी आहे व ती उचित आहे. परंतु ते स्वराज्य आम्हाला नीतीच्या मार्गाने मिळवायचे आहे. आपले स्वराज्य नावाचे नाही तर खरे स्वराज्य असले पाहिजे. परंतु असे स्वराज्य विनाशक उपायांनी मिळू शकणार नाही. उद्योगाची आवश्यकता आहे, परंतु उद्योग सत्याच्या मार्गाने चालायला पाहिजेत. एके काळी भारत सुवर्णभूमी होता कारण त्या वेळी भारतीयांची अंतःकरणेही सोनेरी होती. भूमी अजूनही तीच आहे परंतु माणसे बदलली आहेत. त्यामुळेच ही भूमी आज उजाड झाली आहे. तिला परत एकदा सुवर्णभूमी बनवण्याकरिता आपल्या सद्‌गुणांद्वारा सोने बनावे लागेल. हे परिवर्तन घडवून आणणारा परीस केवळ दोन अक्षरांचा आहे. तो परीस आहे 'सत्य' या दोन शब्दांचा. प्रत्येक भारतीय सत्याचरण करू लागला तर भारताला घरबसल्या स्वराज्य मिळेल.